# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक : बीआयई -२०२४/प्र. क्र.८०३/२४/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ जून, २०२४

प्रति,

विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,
कोकण विभाग व मुंबई पदवीधर मतदारसंघ.
मुंबई व नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघ.

विषय :- २ पदवीधर व २ शिक्षक मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-२०२४
मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तीक रजा मंजूर करण्याबाबत....

महोदय,

भारत निवडणूक आयोगाच्या दि.२४ मे, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकान्वये कोकण विभाग व मुंबई या पदवीधर तसेच नाशिक विभाग व मुंबई या शिक्षक मतदारसंघांच्या व्दिवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. सदर निवडणूकीचे मतदान दिनांक २६ जून, २०२४ (बुधवार) रोजी सकाळी ७.०० ते सायं ६.०० पर्यंत व मतमोजणी दिनांक ०१ जुलै, २०२४ (सोमवार) रोजी होणार आहे.

२. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५-बी नुसार लोकसभा/ विधानसभा निवडणुकांच्या मतदानाच्या दिवशी कर्मचाऱ्यांना भरपगारी रजा देण्याची तरतूद आहे. मात्र, विधानपरिषद शिक्षक/ पदवीधर मतदार संघाकरिता मर्यादित स्वरुपात मतदार असल्याने, त्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३.०६.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदवीधर/शिक्षक निवडणूकीमध्ये मतदार असलेल्या व्यक्तीला विशेष नैमित्तीक रजा जाहीर केलेली आहे. सदरचा शासन निर्णय या कार्यालयाच्या www.ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदरची रजा ही त्यांच्या अनुज्ञेय असलेल्या नैमित्तीक रजेव्यतिरिक्त असणार आहे.

३. उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करुन आपल्या स्तरावरुन याबाबीस स्थानिक वृत्तपत्राव्दारे तसेच दुरदर्शन व आकाशवाणी इत्यादी प्रसारमाध्यमांव्दारे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. ही विनंती.

आपला,

श्री पंजाबराव पवार

(म. रा. पारकर)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

प्रत:- जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,
(मुंबई शहर,मुंबई उपनगर, कोकण व नाशिक विभागातील जिल्हे)